# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**सकाळ**

---

**दिनांक २५.०१.२०२३ बुधवार**

**नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, जुगार, ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुं.दा.का. कायदा अन्वये ०८ केसेस मध्ये एकुण १० ईसमावर कारवाई करून, रू १,५१,०७०/ मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेस मध्ये एकुण १० ईसमावर कारवाई करून, रू ४६,३०५/– चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ४३३१ वाहन चालकांवर कारवाई केली. एकूण रू. ६,५७,९००/– तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे सोनेगाव : – विनयभंग करणाऱ्या आरोपीस अटक**

दिनांक १५.१२.२०२२ चे ११.०० वा. ते दि. २३.०१.२०२३ चे ११.०० वा. चे दरम्यान सुमारास पो. ठाणे सोनेगाव हद्दीत राहणारी २० वर्षीय फिर्यादी हिचे घराजवळ राहणारा आरोपी सर्वेश विनोद राउत वय २६ वर्ष हा नेहमी फिर्यादी ही कॉलेजमध्ये जातांना तिचा नेहमी पाठलाग करतो तसेच तिचेकडे पाहत राहतो आरोपीने फिर्यादीचा विनयभंग करून तु माझे सोबत का बोलत नाहीस असे म्हटल्याने फिर्यादीने ही बाब आई–वडीलांना सांगीतली आरोपीने फिर्यादीला मोबाईलवर मॅसेज पाठवुन फिर्यादीचे भावाला मारण्याची धमकी दिली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.ठाणे सोनेगाव येथे पोउपनि सपोनि ठाकरे ९८२३६०६३४० यांनी आरोपी विरूध्द कलम ३५४(अ), ३५४(ड), ५०६, भादवि अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**( उमेश नासरे )**
**सहा. पोलीस निरीक्षक**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर शहर**

# <u>प्रेसनोट</u>

नागपूर शहरातील वाहतुक परिमंडळ सिताबर्डी हद्दीतील फुटाळा तलाव चौपाटी रोड येथे दरवर्शी २६ जानेवारी ‘‘ प्रजासत्ताक दिन सोहळा ’’ उत्साहात साजरा करण्याचे निमित्याने फुटाळा तलाव चौपाटी रोडवर फार मोठया प्रमाणात तरूणांई तसेच नागरीकांची प्रचंड गर्दी होत असल्याने वाहतुकीची समस्या निर्माण होते. सदरचा २६ जानेवारी ‘‘ प्रजासत्ताक दिन सोहळा ’’ उत्साहात साजरा व सुरळीत पार पाडावा तसेच वाहतूक सुरळीत राहावी, नागरीकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा होवू नये म्हणून दि. २५.०१.२०२२ ला खालील अधिसुचना निर्गमीत केली आहे.

**फुटाळा तलाव (वायूसेना नगर) अंबाझरी वळण ते फुटाळा तलाव टी पांईट (वडाचे झाड) या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतुक बंद करण्यात येत असुन सदर वाहतूक ही खालीलप्रमाणे वळविण्यात येत आहे.**

१) वाडी नाका कडुन फुटाळा तलाव मार्गे जाणारी वाहतुक जुना वाडी नाका ते रविनगर या मार्गाने वळविण्यात येणार आहे. तसेच भरतनगर कडुन येणारी वाहतुक अमरावती रोड/रविनगर महादेवमंदिर वायुसेनानगर या मार्गे वळविण्यात येणार आहे.

२) महादेव मंदिर तेलंगखेडी कडुन फुटाळा तलाव मार्गे जाणारी वाहतुक फुटाळा तलाव टी पांईट येथुन वायुसेना मार्गे वळविण्यात येईल. तसेच वायुसेना मार्ग फुटाळा तलाव ही वाहतुक महादेव मंदिर तेलंगखेडी मार्गे वळविण्यात येईल.

आवश्यकतेनुसार वाहतूक वळविण्याचा अधिकारी हा कर्तव्यावर असणारे पोलीस अधिकारी/अंमलदार यांना राहील.

**सदर अधिसुचना दि २६.०१.२०२३ चे ००.०१ वा. पासून ते २६.०१.२०२३ चे रात्री २४.०० वाजेपर्यंत अंमलात राहिल.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहनचालकांनी या आव्हानाचे पालन करुन आपली होणारी गैरसोय व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/—
(चेतना तिडके)
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर